


**मराठी विभाग द्वारा महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जन्मशताब्दी वर्ष समारोप समारोहानिमित्त आयोजित कार्यक्रमात अभिवादन करताना मान्यवर (25/08/2022)**




**मराठी विभाग द्वारा महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जन्मशताब्दी वर्ष समारोप समारोहानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना बुलढाणा येथील ज्येष्ठ साहित्यिक सुरेश साबळे व उपस्थित मान्यवर (25/08/2022)**




मराठी विभाग द्वारा महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जन्मशताब्दी वर्ष समारोप समारोहानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सिद्धहस्त चित्रकार श्रीधर अंभोरे व उपस्थित मान्यवर (25/08/2022)




मराठी विभाग द्वारा महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जन्मशताब्दी वर्ष समारोप समारोहानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे व उपस्थित मान्यवर (25/08/2022)




मराठी विभाग द्वारा महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जन्मशताब्दी वर्ष समारोप समारोहानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रास्ताविक करताना विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव व उपस्थित मान्यवर (25/08/2022)




मराठी विभाग द्वारा महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जन्मशताब्दी वर्ष समारोप समारोहानिमित्त आयोजित कार्यक्रमात आभार व्यक्त करताना डॉ. सुनील पवार (मराठी विभाग) व उपस्थित मान्यवर (25/08/2022)




नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबीड येथे मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन प्रसंगी उद्घाटकीय मनोगत व्यक्त करताना मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव (16/09/2022)




नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबीड येथे मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन प्रसंगी विद्यार्थिनीला ग्रंथ भेट देताना मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव (16/09/2022)




**कथाकार जयदीप विघ्ने यांच्या भोंगळा पाऊस कथासंग्रहाच्या लोकार्पण समारोह प्रसंगी अध्यक्ष म्हणून उपस्थित मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव (29/09/2022)**



महाराष्ट्रातील एकमेव स्वतंत्र दैनिक

# अजिंक्य भारत

## वाचकांचा प्रतिसाद हेच साहित्यिकांचे यश प्रा. जाधव

### जयदीप विघ्ने यांच्या भोंगळा पाऊस कथासंग्रहाचे लोकार्पण

**देऊळगांव राजा, दि. १ ।** साहित्यिकांचे यश हे बऱ्यासअंशी वाचकांच्या सजगतेवर व प्रतिसादावर अवलंबून असते, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध लेखक व व्यंकटेश महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव यांनी केले. साहित्यस्नेही गोतावळा समुहाच्या वतीने आयोजित कथाकार जयदीप विघ्ने यांच्या भोंगळा पाऊस या कथासंग्रहाच्या लोकार्पण सोहळ्यामध्ये ते अध्यक्ष म्हणून बोलत होते. देऊळगाव राजा शहरात साहित्याची चळवळ वाढीस लागावी यासाठी अशा स्वरूपाच्या कार्यक्रमाची गरज असल्याचे मतही त्यांनी नोंदवले. व्यासपीठावर नगर परिषद शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख, अतिथी प्रसिद्ध ग्रामीण कथाकथनकार डॉ. प्रभाकर शेळके, डॉ. संदीप नागरे व भाष्यकार म्हणून डॉ. भगवान खरात यांची उपस्थिती होती.

राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी जयदीप विघ्ने यांचा व त्यांच्या कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला. मनोगत व्यक्त करताना जयदीप विघ्ने यांनी मला जे सुचलं ते मी लिहिलं चांगलं की वाईट मायबाप रसिक वाचक ठरवतील, असे मत व्यक्त केले. कविवर्य डॉ. सुनील पवार यांनी प्रास्ताविकाच्या माध्यमातून कार्यक्रम आयोजनामागील भूमिका व जयदीप विघ्ने यांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय घडवून दिला. पुस्तकाचे लोकार्पण प्राचार्य संजय देशमुख यांच्या हस्ते झाले. जयदीप विघ्ने हे देऊळगाव राजा शहरासाठी खूप मौल्यवान आहेत. देऊळगाव राजाला एक वेगळी ओळख निर्माण करून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा असणार आहे, असे भाकीत देशमुख यांनी केले. डॉ. प्रभाकर शेळके यांनी कथाकथन करून वातावरण निर्मिती केली तसेच विघ्नेंच्या निवडक कथांवर प्रकाश टाकला. डॉ. संदीप नागरे यांनी मनोगत व्यक्त करताना विघ्ने यांच्या कथेचे जे कथानक आहे ते मी जवळून अनुभवले आहे, असे प्रतिपादन केले. भाष्यकार म्हणून मत व्यक्त करताना डॉ. खरात यांनी कथा माणसाला विविध संदेश देत असतात तसेच कथेमध्ये लेखकाचे अनुभव, निरीक्षण व चिंतन उतरलेले असते, असे प्रतिपादन केले. विषय, वातावरण निर्मिती, व्यक्तिरेखा, निवेदन आणि भाषा या घटकांच्या आधारे त्यांनी जयदीप विघ्ने यांच्या कथांचे विशेष नोंदविले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुलेखनकार प्रल्हाद कायंदे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. अरुण आहेर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हा उपाध्यक्ष मुशीरखान कोटकर, पत्रकार अर्जुन आंधळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर श्रोते उपस्थित होते.

**कथाकार जयदीप विघ्ने यांच्या भोंगळा पाऊस कथासंग्रहाच्या लोकार्पण समारोहाचे वार्तांकन**



मराठी विभाग द्वारा वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना अभिवादन करताना मान्यवर (15/10/2022)




मराठी विभाग द्वारा वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात दिनाचे महत्व पटवून देताना प्रमुख अतिथी प्रा. मधुकर जाधव व उपस्थित मान्यवर (15/10/2022)




मराठी विभाग द्वारा वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतान
डॉ. उमेश देशमुख व उपस्थित मान्यवर (15/10/2022)




मराठी विभाग द्वारा वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रास्ताविक करताना
डॉ. सुनील पवार व उपास्तित मान्यवर (15/10/2022)




**मराठी विभाग द्वारा वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सूत्रसंचालन करताना डॉ. किरण मोगरकर व उपास्तित मान्यवर (15/10/2022)**



दै महाराष्ट्र जीवनचे

# महाराष्ट्र दर्पण

साहित्य, समाज आणि दिशा...

कार्यकारी संपादक - डॉ. सुनिल पवार ९८८१८५१४१३ संपादक - गुलाबराजा फुलमाळी ८७९९५०८१३७

RNI (MAHMAR/२०१४/५९३५६) वर्ष १ ले अंक २१ वा रविवार दि १६ ऑक्टोबर २०२२

## श्री व्यंकटेश महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

द.राजा (दि. १५ ऑक्टोबर)

स्थानिक श्री व्यंकटेश कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून ग्रंथपाल डॉ. उमेश देशमुख उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मराठी विभागप्रमुख प्रा मधुकर जाधव अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कविवर्य डॉ. सुनील पवार यांनी केले.

भारतरत्न डॉ. ए पी ज अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. प्रा. जाधव यांनी वाचन संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी वाचन प्रेरणा दिनानिमित्त आपण संकल्प करायला हवा, असे आवाहन केले.

अध्यक्ष म्हणून उपस्थित डॉ. देशमुख यांनी ग्रंथालयातील पुस्तके आपल्याला खुणावत असतात आपण त्यांच्यापर्यंत पोहचले पाहिजे, त्यांना आपलेसे केले पाहिजे त्यामुळे आपल्या ज्ञानात भर पडते अशी माहिती दिली.

या कार्यक्रमासाठी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बाप माणसाच्या कविता**

साहित्यिक चंद्रकांतदादा वानखेडे

काळी आई जपतेय
माय लेकराचं नातं
लेकराच्या डोक्यावर
सदा असे तिचा हात

तिच्या हिरव्या ओटीत
दिसे भविष्य बळाचं
सारे ऋतू सोसूनिया
भान ठेवते काळाचं

काळ मयूर होतो
नको तिथं दगा देतो
आई सावरून घेते
जे-जे दुःख काळ देतो

आई लेकरू उपाशी
कधी ठेवणार नाही
लेकराच्या भुकेसाठी
तिच्या काळजाची लाही

पाय अनवाणी त्याचे
बाप घामात भिजला

**मराठी विभाग द्वारा वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे वार्तांकन (16/10/2022)**




**संत भगवान बाबा महाविद्यालय, सिंदखेड राजा येथे वाचन प्रेरणा दिनानिमित्त मार्गदर्शन करताना मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव**



देशोन्नती

## वाचनामुळे बुद्धीला चालना मिळते - प्रा.मधुकर जाधव

### भगवान बाबा महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**सिंदखेडराजा** ▪ पुस्तक हे मस्तक घडविते. आपण अविरत वाचन करीत राहिलो तर आपल्या बुद्धीला चालना मिळते, असे प्रतिपादन व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा येथील मराठी विभागप्रमुख प्रा मधुकर जाधव यांनी केले.

स्थानिक भगवान बाबा महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित वाचन प्रेरणा दिनानिमित्त ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून इंग्रजी विभागप्रमुख प्रा.तात्याराव निकाळजे हे उपस्थित होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. किशोर बळसे, मराठी विभागप्रमुख डॉ.पंढरी डोईफोडे यांची उपस्थिती होती. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना प्रा.जाधव यांनी वाचनाचे फायदे व वाचन संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी केले जाणारे प्रयत्न याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी ग्रंथालयासाठी स्वलिखित 'संस्कृती : काल आणि आज' हे पुस्तक भेट दिले.

कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून उपस्थित प्रा.निकाळजे यांनी मिसाईलमॅन डॉ.अब्दुल कलाम यांचे देशाप्रती असलेले योगदान सोदाहरण पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.पंढरी डोईफोडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.शिल्पा काकडे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ.प्रिया बोचे यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Deshonnati Edition
Oct 19, 2022 Page No. 6
Powered by : eReleGo.com

**कार्यक्रमाचे वार्तांकन....**



मराठी विभाग द्वारा मेहुणा राजा (मेहुणपुरी) येथे आयोजित अभ्यास दौऱ्यात संत चोखामेळा यांना अभिवादन करताना मराठी विभाग प्रमुख प्रा. मधुकर जाधव (14/01/2023)



मराठी विभाग द्वारा मेहुणा राजा (मेहुणपुरी) येथे आयोजित अभ्यास दौऱ्यात संत चोखामेळा पालखी मिरवणुकीत सहभागी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव (14/01/2023)




**मराठी विभाग द्वारा भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रास्ताविक करताना विभागप्रमुख प्रा, मधुकर जाधव व उपस्थित इतिहास विभागप्रमुख डॉ. आर.एच. देवरे (15/01/2023)**



**मराठी विभाग द्वारा भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित कार्यक्रमात भाषेचा इतिहास व महत्त्व पटवून देताना इतिहास विभागप्रमुख डॉ. आर.एच. देवरे व उपस्थित विभागप्रमुख प्रा, मधुकर जाधव (15/01/2023)**




**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त नगर परिषद, देऊळगाव राजा द्वारा आयोजित कवी संमेलनात सहभागी मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव (24/01/2023)**



# दे.राजा न.प.च्या वतीने कवी संमेलन संपन्न

मातृभूमि वृत्तसेवा

। देऊळगाव राजा, दि.२८ ।

बाजार माणसांचा भरलेला पाहिला मी, देवास वाहिलेला माणूस पाहिला मी, कोणती अशी गरीबी आली या नभाला, तारका अंबरीच्या तुटताना पाहिल्या मी' कवी डॉ. ललित अधाने यांच्या या कवितेसह अन्य कवींनी सादर केलेल्या दर्जेदार कविता रसिक श्रोत्यांची भरभरून दाद मिळवून गेल्या. निमित्त होते मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे. नगर पालिकेच्या वतीने कवी संमेलन पार पडले. या कवी संमेलनाचे उद्घाटन पालिकेचे मुख्याधिकारी अरुण मोकळ यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी डॉ. भगवान खरात होते.शिवाजी हायस्कूलचे मुख्याध्यापक संजय देशमुख यांनी प्रास्ताविकात मराठी भाषा संवर्धनाची गरज अधोरेखित केली. मुख्याधिकारी मोकळ यांनी भाषा संवर्धनासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे सांगितले. डॉ. भगवान खरात यांनी मराठी भाषा संवर्धनासाठी प्राचीन काळापासून झालेल्या प्रयत्नांची माहिती दिली. या संमेलनात डॉ. सुनील पवार, डॉ. विष्णू सुरासे, प्रा. मधुकर जाधव, जयदीप विघ्ने, शेख बिस्मिल्ला सोनोशी, ॲड. वर्षा कंकाळ, शारदा दराडे यांनी कविता सादर केल्या. एकापाठोपाठ एक सादर होणाऱ्या आशयघन कवितांना रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कवींना मिळालेल्या या प्रोत्साहनामुळे चैतन्यमयी वातावरणाची अनुभूती आली. यावेळी पालिकेचे कर्मचारी, शिवाजी हायस्कूलचे शिक्षक व कर्मचारी, शहरातील रसिक श्रोते, सुषमा राऊत, अशरफ पटेल, अर्जुन आंधळे, सुरज गुप्ता, अशोक जोशी, मुशीरखान कोटकर आदींची उपस्थिती होती.

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त नगर परिषद, देऊळगाव राजा द्वारा आयोजित कवी संमेलनाचे वार्तांकन**



कुसुमाग्रज जयंती अर्थात मराठी भाषा गौरव दिन निमित्त अभिवादन करताना विभाग प्रमुख प्रा. मधुकर जाधव (27/02/2023)



दै.महाराष्ट्र जीवनचे

महाराष्ट्र साहित्य दर्पण

समाज, दिशा आणि दशा

कार्यकारी संपादक : डॉ सुनील पवार ९८८१८५१४१३ संपादक : गुलाबराजा फुलमाळी ८७९९५०८१३७

RNI(MAHMAR/२०१४/५९३५६) वर्ष १ ले अंक १५८ वा रविवार दि ५ मार्च २०२३

## श्री व्यंकटेश महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन संपन्न

### कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन

देऊळगाव राजा (प्रतिनिधी) स्थानिक श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये मराठी विभागाच्या वतीने कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीचे औचित्य साधून मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विषय निवड, हस्ताक्षर, लेखन विषयक नियम या निकषांच्या आधारे स्पर्धकांचे मूल्यमापन केले जाणार आहे. कुसुमाग्रज यांना अभिवादन करण्यासाठी मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव, डॉ. सुनील पवार, डॉ. एकनाथ भालेराव व डॉ. संदीप जगताप यांची उपस्थिती होती.

कुसुमाग्रज जयंती अर्थात मराठी भाषा गौरव दिन निमित्त आयोजित कार्यक्रमाचे वार्तांकन (05/03/2023)




**श्री शिवाजी महाविद्यालय, चिखली येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव (28/02/2023)**



दैनिक आम्ही चिखलीकर
रोखठोक आणि निर्भिड
■ मुख्य संपादक : छोटू एस. कांबळे ■ कार्य. संपादक : ॲड. गुणवंत डी. नाटेकर
वर्ष : ५ वे | अंक : ३० | बुधवार, ०१ मार्च २०२३ | पृष्ठे : ४ | मूल्य : २ रूपये

सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना
ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.
दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

## मराठी ही आपल्यासाठी राजभाषाच - प्रा. मधुकर जाधव

### श्री शिवाजी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**चिखली/दै. आम्ही चिखलीकर–** मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळावा यासाठी आपण प्रयत्नशील आहोतच तो मिळेलच परंतु सद्यस्थितीला प्रत्येक मराठी माणसाच्या हृदयात मराठी ही राजभाषा म्हणूनच विराजमान आहे, असे प्रतिपादन देऊळगाव राजा येथील श्री व्यंकटेश महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव यांनी केले.

स्थानिक श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयात कविवर्य कुसुमाग्रज यांची जयंती अर्थात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते अतिथी म्हणून बोलत होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. गणेश मालटे हे उपस्थित होते.

प्रा. मधुकर जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मराठी भाषेचा इतिहास, मराठी भाषेतील समृद्ध साहित्य परंपरा, विविध साहित्य प्रवाहांचे योगदान आदी मुद्द्यांवर संवाद साधला. प्रा. डॉ. गणेश मालटे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मराठी भाषेसंबंधी विविध मुद्द्यांवर मत मांडताना मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. प्रा. मधुकर जाधव यांनी श्री शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागाला भेट देऊन मराठी विषयाच्या प्राध्यापकांनी तयार केलेल्या बुलडाणा जिल्ह्यातील साहित्यिकांच्या सुचीचे अवलोकन करून कौतुक केले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांतकुमार डोंगरदिवे यांनी केले तर प्रा. संदीप उन्हाळे यांनी प्रास्ताविक केले. आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सुनील पवार यांनी केले.

**श्री शिवाजी महाविद्यालय, चिखली येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे वार्तांकन**




**महाराष्ट्र साहित्य दर्पण आयोजित राज्यस्तरीय साहित्य संमेलनात पुस्तक प्रकाशन सोहळ्यात अतिथी म्हणून उपस्थित मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव (09/04/2023)**




**महाराष्ट्र साहित्य दर्पण आयोजित राज्यस्तरीय साहित्य संमेलनात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव (09/04/2023)**



**न.प. श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, दे. राजा यांच्या वतीने आयोजित भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात अभिवादन करताना मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव**




**न.प. श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, देऊळगाव राजा यांच्या वतीने आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव**